ज्ञान
योजकता
व कष्टाने
प्रगती होते

डिसेंबर २००८ । २५ रुपये

आधुनिक व्यापारी शेतीचे मासिक


# बळीराजा



जैन ठिबक
पाणी थेंबानं... पीक जोमानं!




# विक्रमी उत्पन्न भाजीपाल्याचे...
# 'जैन ठिबक'च्या ओलाव्याचे...



रोजचा ताजा भाजीपाला मंडईला म्हणजे बक्कळ पैसा खिशाला!
रोकड देणारे पीक पण तेवढेच नाजूक काम! रसरशीत,
टवटवीतपणा भाजीच्या निरोगीपणावर अवलंबून असते
अन् हा सगळा खेळ **'जैन ठिबक'** द्वारा
पाणी पुरवठ्याच्या नेमस्त नियोजनावर चालतो
हे शेतक-यांना पक्के ठाऊक आहे!
टोमॅटो, वांगी, भेंडी, मिरची, बटाटा, कांदा, काकडी,
कोबी, फ्लॉवर, कारले, आवळा...
पालेभाजी असो वा फळभाजी...
**'जैन ठिबक' द्वारा उत्पन्नात बाजी...!**

**लोडशेडींगची धास्ती हवी कशाला,**
**'जैन ठिबक' आहे सोबतीला...!**

**जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.**

**जैन प्लास्टीक पार्क, पो.बॉ. ७२, जळगांव – ४२५००१.फोन: ०२५७–२२५८०११;**
**फॅक्स्: ०२५७–२२५८१११; ई–मेल:** jisl@jains.com; **वेबसाईट:** www.jains.com

**कार्यालय: अहमदनगर:** ०२४१-२४१५४८१; **अमरावती:** ०७२१-२६७४७३७; **औरंगाबाद:** ०२४०-२३४५१३६; **लातूर:** ०२३८२-२२४०९८; **मुंबई:** ०२२-२२१२९०९०; **नागपूर:** ०७१२-६४५०८४३; **नांदेड:** ०२४६२- २७४०४६; **नाशिक:** ०२५३-२५९७५०३; **पंढरपूर:** ०२१८६-२२२६३१; **रत्नागिरी:** ०२३५२-२३००३३; **सांगली:** ०२३३-२४२२१००; **सोलापूर:** ०२१७-२३५७३९५; **ठाणे:** ०२२-२५४४३९९२.

**अथवा आजच नजिकच्या जैन ठिबक वितरकांशी संपर्क साधा.**

जैन पाईप | जैन ठिबक | जैन पीई पाईप | जैन स्प्रिंकलर | जैन टिश्यूकल्चर | जैन सौरबंब | Chapin | API | PEPCO | NAANDANJAIN

# उच्च तंत्रज्ञानाला जवळ केल्याशिवाय शेतकऱ्यांचा उद्धार नाही



कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते 'पद्मश्री स्व. डॉ. आप्पासाहेब पवार आधुनिक कृषि उच्च तंत्र पुरस्कार' स्वीकारताना श्री.भगवानराव क्षीरसागर व सौ. क्षीरसागर; श्री. विश्वासराव पाटील व सौ. पाटील,समवेत ज्येष्ठ उद्योगपती भंवरलाल जैन

जळगांव दि. २१: भारतातील ६४ टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून असून त्यांची प्रगती झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही. देशाची प्रगती जर करायची असेल तर शेती व शेतकऱ्यांकडे अधिक लक्ष द्यावे लागेल असे नि:संदिग्ध प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केले. शेतकरी हा केवळ अन्नदाताच नाही तर ती एक मोठी क्रयशक्ती हे आहे. जवळपास ६० टक्के शेतकरी वर्गाच्या माध्यमातून असलेली मोठी शक्ती बाजारपेठेपासून जर दूर असेल तर प्रगती कशी होईल असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

'पद्मश्री कै. डॉ. आप्पासाहेब पवार आधुनिक कृषि उच्च तंत्र पुरस्कार' प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. महाराष्ट्राचे कृषि मंत्री बाळासाहेब थोरात, उच्च व तंत्र शिक्षण, ऊर्जा मंत्री दिलीप वळसे पाटील, जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. भवरलालजी जैन, खा. वसंतराव मोरे, खा. हरिभाऊ जावळे, आ. सुरेशदादा जैन, जैन चॅरिटीजचे विश्वस्त ना. धों. महानोर, पुरस्कार प्राप्त सत्कारमूर्ती श्री. विश्वासराव आनंदराव पाटील व त्यांच्या धर्मपत्नी सौ. निर्मलाबाई, श्री. भगवानराव यशवंतराव क्षीरसागर व त्यांच्या धर्मपत्नी सौ. तुळसाबाई, पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष माजी कुलगुरु डॉ. शंकरराव मगर आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आप्पासाहेब पवार, अण्णासाहेब शिंदे, स्वामीनाथन यासारख्या कृषि तज्ज्ञांच्या योगदानामुळेच अन्नधान्याच्या बाबतीत आपला देश स्वयंपूर्ण झाला. तथापि, पुन: या क्षेत्राकडे दुर्लक्ष झाल्याने दुर्दैवाने अन्नधान्य आयात करण्याची वेळ आली. यावर मात करण्यासाठी अधिकाधिक उत्पन्न घेण्याशिवाय पर्याय नव्हता. कृषि क्षेत्रातील उच्चतंत्र व पाण्याच्या नियोजनामुळेच आज देश पुन्हा धान्याच्या कोठारानी भरला आहे, असे पवार यांनी सांगितले.

आप्पासाहेब पुरस्काराच्या निमित्ताने निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या माध्यमातून पुन्हा एकदा कोरडवाहू शेतीही फायद्याची ठरू शकते हे सिद्ध झाले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत पाटील व क्षीरसागर या शेतकऱ्यांनी उत्तम काम केले आहे. केवळ स्वत:चे शेतच नव्हे तर इतरांचेही जीवन समृद्ध होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. अशा आदर्श शेतकऱ्यांची निवड झाल्यामुळे पुरस्काराचीही प्रतिष्ठा वाढली असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी काढले. कोरडवाहू शेतीतूनही अधिकाधिक उत्पादन घेण्यासाठी ठिबक सिंचन हा मूळ मंत्र आहे. हा आधुनिक कृषि उच्च तंत्राचा मंत्र आप्पासाहेबांनी दिला. भवरलाल जैन यांनी हे तंत्र अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. जैन इरिगेशनचे ठिबक सिंचनातील योगदान मोलाचे असल्याचेही ना. पवार यांनी सांगितले.

या पुरस्काराच्या माध्यमातून दोन्ही शेतकऱ्यांनी अधिक काम करण्याची तडफ दाखविली आहे. इतर शेतकऱ्यांसाठी ते प्रेरणास्थानी आहेत. इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देण्याचे, ठिबक सिंचन सारख्या उच्च तंत्राचा प्रसार करण्याचे कार्यही ते करत आहेत. उच्च तंत्र प्रसाराच्या या कार्याची खऱ्या अर्थाने राष्ट्रीय गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आप्पासाहेब पवार हे शेती व शेतकरी विकासासाठी झपाटलेले व्यक्तिमत्त्व होते. कृषि विकासात आप्पासाहेबांचा वाटा हा महत्त्वाचा आहे हे लक्षात घेता त्यांचा हा विचार सर्वदूर पोहोचविण्याचे कार्य या पुरस्काराच्या माध्यमातून यशस्वीपणे होत असल्याचे महाराष्ट्राचे कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. पुरस्कारप्राप्त श्री. पाटील व क्षीरसागर हे केवळ प्रगतीशील शेतकरीच नव्हे तर ते एक विद्यापीठच आहे. मृदसंधारण व जलसंधारण म्हणजे काय हे जालना जिल्ह्यातील कडवंचीला गेल्यावर समजते. शेतीपुढे आजची आव्हाने निर्माण झाली आहेत त्या सर्वांला जल संधारणाचाच पर्याय मोलाचा आहे. जैन ठिबक सिंचनाच्या सहाय्याने ४० आरला ४० क्विंटल कापूस शेतकऱ्यांनी घेऊन दाखवला आहे. ठिबक सिंचनाला जवळ केल्यास राज्याची शेती बदलायला वेळ लागणार नाही. सर्व प्रश्नांवर उपाय हा ठिबक सिंचनच असल्याचे पद्मश्री भवरलाल जैन यांचे मत आता आम्हाला पटले असल्याचे गौरवोद्‌गारही थोरात यांनी काढले. पाण्याचे महत्त्व ओळखून पद्मश्री भवरलाल जैन यांनी ठिबकच्या माध्यमातून सुरू केलेल्या जैन इरिगेशनचा आता वटवृक्ष झाला असल्याचेही कृषिमंत्र्यांनी नमूद केले.

**जोपर्यंत शेतीला सन्मान मिळत नाही तोपर्यंत शेतकऱ्याला चांगले दिवस आले असे म्हणता येणार नाही. शेतकऱ्याला व शेतीला चांगले दिवस आणण्यासाठी आप्पासाहेबांनी महत्त्वपूर्ण कार्य केले असल्याचे जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले.** सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी माझी व आप्पासाहेबांची पहिली भेट कृषि प्रदर्शनाच्या निमित्ताने अमेरिकेत झाली. या पहिल्या भेटीतच कृषि क्षेत्रातील त्यांची दूरदृष्टी माझ्या लक्षात आली. आप्पासाहेबांनी केलेले कार्य हे आमच्या प्रेरणास्थानी आहे. त्यांच्या कार्याला, विचाराला व आधुनिक कृषि उच्च तंत्रज्ञानाला पुरस्काराच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आम्ही प्रयत्न करीत असल्याचे भवरलाल जैन यांनी सांगितले.